# घोषणा

**समांतर आरक्षणासंदर्भातील** शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक: एसआरव्ही १०१२/प्र.क्र.१६/१२/१६-अ, दिनांक १३ ऑगस्ट, २०१४ मधील तरतूदी व त्यातील संदर्भित न्यायनिर्णय विचारात घेता ज्या पदांना मुलाखती नाहीत अशा पदांकरिता ज्या उमेदवारांनी त्यांच्या ऑनलाईन अर्जामध्ये **खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणांतर्गत आरक्षित पदांचा** (अराखीव (महिला), अराखीव (खेळाडू) इत्यादी) दावा केला आहे, त्या उमेदवारांचे सदर दावे निकालप्रक्रियेच्या वेळी त्यांच्या प्रमाणपत्रांच्या आधारे तपासण्यात येतील व प्रमाणपत्र तपासणीनंतर सदर दावे योग्य असल्याचे आढळून आल्यास त्यांचे सदर दावे ग्राहय धरण्यात येतील. उमेदवारांनी अर्जामध्ये केलेले दावे विसंगत असल्याचे आढळून आल्यास **खुल्या प्रवर्गातील समांतर आरक्षणांतर्गत आरक्षित पदांचा लाभ सदर उमेदवारांना देय ठरणार नाही.**

**ठिकाण - मुंबई**
**दिनांक - १५ नोव्हेंबर, २०१७**

**प्रदीपकुमार**
**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.**